# पाठचिकित्सा पध्दती व नकल निर्मिती

(दांगट शुभांगी सुभाष, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर)

मराठी प्राचीन साहित्य हे मुळातच मौखिक आणि पाठांतर परंपरेतून अविष्कृत झाल्याचे दिसते. हे साहित्य संक्रमित होत असताना त्यात बदल होते गेला या बदलामुळे, एका ग्रंथाच्या एकापेक्षा अनेक संहिता निर्माण झाल्या; आणि यातूनच पाठसंशोधनाची गरज भासू लागली एकाच कलाकृतीच्या किंवा एकाच लेखकाच्या अनेक कलाकृतींच्या एकाच वेळी अनेक अनुकृती उपलब्ध होतात. त्यामुळे मुळ लेखक कोण ? मुळ संहिता कोणती? आणि लेखक आणि संहिता यांचा काळ कोणता? हे ठरविण्यासाठी पाठसंशोधन शास्त्राची निर्मिती झाली. मराठी प्राचीन साहित्य परंपरेत एकाच कलाकृतीच्या अनेक हस्तलिखीतांच्या पोथीशाळा निर्माण झाल्या असल्याने अशा साहित्याचा शास्त्रशुध्द आणि मुलगामी अभ्यास करण्यासाठी पाठसंशोधन शास्त्राची गरज पडते.कारण हस्तलिखिते आणि ऐतिहासिक कागदपत्र, पुराभिलेख, कोरीवलेख, मूर्ती, शिल्प, नाणी यांच्या वाचनासाठी आणि पाठनिश्चिती करून मुळ संहितेपर्यंत पोहोचण्याठी दुसरा मार्ग नाही कारण लेखकांच्याच हस्तलिखितातील मुळप्रत उपलब्ध होऊ शकत नसते. त्यावेळी पाठसंशोधकाला, लेखकाला अभिप्रेत असू शकेल अशी त्याच्या मानसिकतेच्या जवळ जाणारी 'मुळ प्रत' सिद्ध करावयाची असते. आणि ती सिध्द करण्यासाठी तो पाठसंशोधन शास्त्राची मदत घेतो.

पाठसंधोधनाच्या सहाय्याने 'संहिता' संशोधनापर्यंत जाता येते. 'संहिता' ही संकल्पनाही अतिशय व्यापक आहे. संहिता म्हणजे केवळ हस्तलिखित नव्हे ! शिल्प चित्र, मुर्ती, नाणी, ताम्रपट, शिलालेख यांच्याही संहिता उपलब्ध होऊ शकतील व त्यांचेही पाठसंशोधन करावे लागेल. नाणक संशोधनात ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनात संहितेप्रमाणे काही निकष बदलू शकतील किंवा काही नवे निकष घेऊन संहिता निश्चित करावी लागेल ! पाठसंशोधन हा 'संहिता संशोधननिष्ठ' शोध ठरता.

इंग्रजीतील Textual Criticism ला मराठीमध्ये प्रा. बनहट्टी यांनी ' पाठसंशोधनाविद्या' ही संकल्पना तयार केली. प्रा सुरेश डोळके यांनी पाठचिकित्सा काही मुलतत्त्वे या लेखात 'पाठचिकित्सा' ही संकल्पना स्वीकारली आहे. श्री र कुलकर्णी यांनी 'पाठचिकित्साशास्त्र ' ही संकल्पना स्वीकारली श्री र.कुलकर्णी , डॉ. व.कुलकर्णी , डॉ. म.रा. जोशी यांनीही हीच संकल्पना अनुसरली आहे. प्रा.श्री .ना.बनहट्टीनी 'पाठसंशोधनविद्या' या संकल्पनेप्रमाणेच ' पाठसंशोधनाचे शास्त्र' ही संकल्पना मांडली आहे. म.वा धोंड यांनी संहिता चिकित्साशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. 'संहिता चिकित्साशास्त्र' म्हणजे उपलब्ध साधनांची चिकित्सा करून एखाद्या ग्रंथाची मुळ संहिता निश्चीत करण्याचे शास्त्र उपलब्ध साधनांचे दोन प्रकार पडतात. मुख्य साधने व पुरक साधने मुख्य साधने म्हणजे त्या ग्रंथाच्या हस्तलिखीत व मुद्रित प्रती होय तर पुरक साधने म्हणजे वेचे उध्दरणे टीका भाषांतर , सार वैगेरे नात्यांनी मुळ ग्रंथाशी संबंधित असलेले साहित्य होय. यावरून असे म्हणता येईल की ग्रंथनिश्चितीचे शास्त्र म्हणजे पाठसंशोधन शास्त्र होय.

पाठसंशोधकाला पाठनोंदणी , पाठनिश्चिती, पाठसंकलन, परंपराशोधन, अंतर्गत पुरावे व बाह्य पुरावे मिळविणे, इतर अभ्यासपद्धतींचा विचार करणे ग्रंथकार , ग्रंथ यांचा कालनिश्चित करणे, वर्गीकरणाच्या सहाय्याने हस्तलिखितांच्या आणि इतर पुरक साधनांचा वंधवृक्ष बांधणे व संहिता संपादित करणे ही कामे करावी लागतात. अर्थात मुलसंहितासंस्थापना करावी लागते किंवा लेखकाला अभिप्रेत असलेली त्याच्या मानसिकतेच्या जवळ जाणारी संहिता निश्चित करावी लागते. त्यासाठी शेवटी शब्दार्थ कोश पारिभाषिक संज्ञाकोश द्यावा लागतो व प्रस्तावनेमध्ये पाठसंशोधनासाठी जी जी अभिक्रिया केली

त्याचा तपशील दिला जातो. म्हणजे 'संशोधितसंपादणी' असे पाठसंशोधनातून हाती आलेले फलित आसते.

इंग्रजीतील Textual Criticism साठी मराठीमध्ये पाठचिकित्साशास्त्र, संहितासमीक्षा, संहिताचिकित्सा, पाठसंशोधविद्या, पाठसंशोधनशास्त्र, संहितानिश्चीतीशास्त्र , संहितासंशोधन, संहिता मुलस्थापनाशास्त्र , प्रत्यक्षनिष्ठ संशोधन , ग्रंथमुलस्थापनाशास्त्र, मुलग्रंथस्थापनाशास्त्र अशा विविध संकल्पना स्वीकारल्या गेल्या

मराठी साहित्यापुरते बोलायचे झाले तर प्राचीन साहित्य, ताम्रपट, शिलालेख, मूर्तीकला चित्रकला, यांच पुरतेच पाठचिकित्साशास्त्र मर्यादित झाल्याचे दिसते, तरंतु मराठी साहित्यामागची सातशे वर्षाची परंपरा व मुद्रणाची सोय नसल्यामुळे निर्माण झालेली विपूल हस्तलिखीत परंपरा यांचा शोध घेण्यासाठी पाठसंशोधना शिवाय दूसरा पर्याय उरत नाही. म्हणून हे शास्त्र एकीकडे पाठसंशोधनाचा पाया आहे, तर दुसरीकडे साहित्यसंशोधनाची ती प्रगल्भ आणि परिपक्व अशी शाखा आहे. उदा. महानुभव वाङ्मयाचे पाठसंशोधनात्मक पद्धतीने डॉ.वि. भि कोलते यांनी केलेले संशोधन.

अ. का प्रियोळकरांचे 'दमयंती स्वयंवर रा.ग. हर्षे यांचे 'ज्ञानेश्वरी' संशोधन कृ.पा कुलकर्णी यांचे 'विवेकसिंधु' संशोधन हे सर्व संशोधन पाठचिकित्सा शास्त्राच्या पायावरच उभे आहेत आणि पाठ चिकित्सेमुळे आज ते मौलीक साहित्य अभ्यासकांच्या हाती यथामुल पध्दतीने येवून पोहचले आहे.

- ❖ **पाठसंशोधनशास्त्र म्हणजे काय ?**

पाठसंशोधन हे एक प्रात्यक्षिक संशोधन आहे म्हणजेच Active Research आहे. कारण त्यात Criticism पेक्षा Research ला महत्त्व आहे. या दृष्टीने मराठी साहित्याचे संशोधन करताना पाठचिकित्साशास्त्राची आवश्यकता असते. या शास्त्राला Textual Criticism असा प्रतिशब्द वापरला जातो. पाश्चात्य संशोधकापुढे मुळ मुद्रित प्रत उपलब्ध असल्यामुळे तिची संपादणी संशोधकांना करावी लागली या मधून Textual Criticism ही परीभाषा पाठचिकित्साशास्त्राला उपयोजिली गेली. परंतू मराठी संशोधनाच्या संदर्भात पाठचिकित्साशास्त्राला Taxtual Research असे संबोधावे लागेल.

मुल संहितानिश्चिती करणे व संहितेची मुल स्थापना करणे हे मराठी साहित्याच्या संदर्भातील पाठचिकित्साशास्त्राचे महत्त्वाचे कार्य आहे. पाठशुध्दी, पाठचिकित्सा, पाठसंशोधन आणि पाठविज्ञान या सर्व संकल्पनांना पाठचिकित्साशास्त्राात विलक्षण महत्त्व आहे. विविध साधनचिकित्सेतून पाठचिकित्सेपर्यंत संशोधक पोहचू शकतो. यातून शब्दकोशनिर्मिती, स्थळकाळाची अस्सलता, स्वीकृत साहित्याचा वंशवृक्ष आणि त्यांच्या शाखोपशाखा, भाषाशास्त्र व्याकरण , वाङमयीन आशयाचे स्वरूप, शब्दघडण, पदसिध्दी, अर्थनिश्चीती, मूलसंहितास्थापना, सूचिशास्त्र, हस्तलिखित वर्णने इ. बौध्दिक कसरतीने संशोधक मुळ संहितेपर्यत पोहचतो.

- ❖ **पाठ आणि प्राचीन साहित्य –**

महानुभाव साहित्यात आणि वारकरी साहित्यात 'पाठ' या शब्दाभोवती एक विशिष्ट संकल्पना निर्माण झाली आहे. महानुभाव परंपरेत 'पाठ' म्हणजे चक्रधरांनी दिलला आदेश , घडा, Lesson असा आहे. वारकरी परंपरेत अभंगनिर्मिती ही मुलत: प्रार्थनेंसाठी त्यामुळे हरिपाठ म्हणजे Learnt by heart

‘पाठ’ म्हणजे ‘पठण ग्रंथ’ किंवा ‘ पठण अभंग ’ असा त्यामागील अर्थ होय. पाठचिकित्साशास्त्रात ‘पाठ’ म्हणजे मुळ संहितेतील शब्द त्याचा आशय त्याचे भाषाशास्त्रीय व्याकरणीय स्वरूप हा होय मुळ संहितेतील पदरचना किंवा वाक्यरचना यामधील शब्दविचार अशी ‘पाठ’ या शब्दामागील भुमिका होय. अशा पाठाची चिकित्सा संशोधन आणि शुध्दता निश्चीत करणारे जे शास्त्र ते पाठचिकीत्साशास्त्र होय.

१५ व्या शतकापासून विद्येच्या पुररूज्जीवनाकडे संशोधकाचे लक्ष वेधले व त्यातून ग्रीक लॅटीन ग्रंथाच्या सशास्त्र शोधण्या जन्माला आल्या व कोणत्या पध्दतीने हे संशोधन झाले याविषयीही तिकडे विस्तृत लेखन झाले व त्यातून पाठचिकित्सेला शास्त्रीयता व अचुकता आली . १९ व्या शतकातही इंग्रजी भाषेच्या व वाङ्मयाच्या परिचयाने व विद्यापीठांच्या स्थापनेमुळे संशोधन क्षेत्रात बदल झाला आणि यातुनच हस्तलिखितांच्या संशोधनाला गती मिळाली ‘नवनित’, ‘विविधज्ञानविस्तार काव्येतिहासंग्रह, काव्योदय, सर्वसग्रह ’ या आणि अशा प्रकारच्या अनेक नियकालिकांनी जूनी मराठी हस्तलिखिते मिळवून त्यांची बाडे तपासून प्रसिध्द करण्यास सुरूवात केली महानुभाव साहित्य हे तर सांकेतिक लिप्यांमध्ये बंदिस्त होते. वि.ल भावे आणि राजवाडे यांनी सांकेतिक लिप्यातील गुप्तता नष्ट करून महानुभाव साहित्य सर्वासाठी खुले करून दिले. या काळात खऱ्या अर्थाने वाङ्मयीन विव्दत्संशोधनाला सुरूवात झाली. अनेक हस्तलिखिते प्रसिध्द होऊ लागताच संशोधकाचे लक्ष पाठचिकित्सेकडे वळले.

❖ **पाठचिकित्सेच्या पध्दती :—**

प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधन करताना संशोधकांनी पाठचिकित्सेच्या दोन पध्दती

स्विकारल्या आहेत.

१ ज्ञेयनिष्ठ (Objective )

२ ज्ञातृनिष्ठ (Subjective )

यातील ज्ञेयनिष्ठ पध्दतीला वस्तुनिष्ठ आणि ज्ञातृनिष्ठ पध्दतीला व्यक्तिनिष्ठ असे म्हटले जाते वि. का राजवाडे बा.अ. भिडे डॉ कोलते, डॉ डोळके या संशोधकांनी अनेक हस्तलिखितातील एक अधिकृत हस्तलिखीत निश्चीत करून इतर पोथ्यातील पाठ पाठसंचयात देऊन ज्ञेयनिष्ठ पध्दतीचा अवलंब केलेला दिसतो प्रतप्रमाण भूमिका त्यांनी स्विकारली म्हणून त्यांच्या पध्दतीला प्रतप्रामाण्यावादी पध्दती असेही म्हणतात. विविध नकलातील पाठ टिपून त्याची परस्पर तुलना मुळ अधिकृत हस्तलिखीताशी करून संशोधन केले जाते त्याला काहींनी परंपरावादी असे म्हटले आहे. तिलाच शास्त्रीय पध्दती असेही म्हणतात एका विशिष्ट काळातील भाषेचे व्याकरणाचे आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब पाहण्यास ही पध्दती उपयुक्त ठरते. उदा. डॉ. डोळके यांचे रूक्मिणीस्वयंवर कोलते यांचे ‘ वछाहरण , ज्ञानप्रबोध’ .

वस्तुनिष्ठ पध्दतीत अधिकृत संहिता व पाठ व्यवस्थपन पध्दतीने काम करावयाचे असते , तर व्यक्तिनिष्ठ ( ज्ञातृनिष्ठ ) पध्दतीत चिकित्सक बुध्दीला पटलेला पाठ स्वीकारून मुल संहितेची पुनर्स्थापना करीत असतात. या पध्दतीला चिकित्सक पध्दती असेही म्हणतात. शाखा , परंपरा आणि वंशपरंपरेतून समजा तीन ते चार हस्तलिखिते स्वतंत्र पाठ दर्शवीत असली तर चिकित्सकाने नेमका कोणता पाठ उचलावयाचा ही खरी कसोटीची वेळ असते. बऱ्यापेक्षा खरा आणि आवडीपेक्षा निवडीला महत्त्व दिले पाहिजें त्यापेक्षा भाषाविज्ञान व पाठविज्ञानाच्या आधाराने त्याने पाठसंशोधन आणि पाठशुध्दी केली पाहिजे . सांप्रदायिकता आणि पारंपारिकता यांचे अडसर दुर करून मुळ पाठापर्यंत पोहचले पाहिजे महानुभाव

आणि ख्रिस्ती वाङ्मयाचे संशोधन मराठीमध्ये ज्ञेयनिष्ठ पध्दतीने झाले तर भागवत सप्रदायाच्या साहित्याचे संशोधन ज्ञातृनिष्ठ पध्दतीने झाल्याचे दिसते.

❖ **दोष :—**

१ संशोधकाने घेतलेले पूर्ण स्वातंत्र्य हा एक दोष आहे.

२ संपादक संशोधनाच्या नावाखाली एक नवी संहिताच पुनर्रचित करतो. त्यास संपादकाची वैयक्तिक मते मिसळून जाण्याची विशेष संभावना असते.

३ मूल शोधनापेक्षा आणि मूल स्थापनेपेक्षा संशोधक नवरचना करण्याचे स्वातंत्र्य होतो.

❖ **प्रतिलेखन किंवा नकला निर्मीतीची कारणे :—**

नकला निर्माण होण्याचे सर्वात मुख्य कारण म्हणजे मुद्रण कलेचा अभाव होय. संप्रदाय मान्यता, धर्ममान्यता आणि लोकमान्यता प्राप्त झालेल्या ग्रंथच्या प्रती संग्रहीत ठेवण्यातील प्रतिष्ठेमुळे ग्रंथ नकला झाल्या. ग्रंथ पूजा व मनन चिंतनासाठी धार्मिक ग्रंथ म्हणून ग्रंथ नकला करण्याकडे लक्ष वेधले गेले. मुळ ग्रंथसंहिता आज उपलब्ध नसल्या तरी त्या ग्रंथाच्य असंख्य प्रती मात्र उपलब्ध होतात व त्यात अनेक पाठ—पाठांतरे मिसळून जातात मुळ ग्रंथ जितका समाजमनात खोलवर रूतुन बसलेला असेल तिक्या प्रमाणात असंख्य नकला होत गेल्या.

❖ **नकला करण्याच्या विविध पध्दती** —

नकल करणारा ज्यावेळी हस्तलिखिताची नकल करण्यास घेतो त्यावेळी ते हस्तलिखित कसे आहे, त्याचे स्वरूप कसे आहे , यावर त्याची नकल अवलंबून असते. पठण परंपरेने नकल करण्यास घेतली असल्यास एकाने मुखपाठ म्हणावयाचे व दुसऱ्याने लिहुन काढावयाचे ही पध्दती वापरली जाते म्हणून अनेक पाठांतरे निर्माण होतात. एक म्हणजे चुकीचे वाचन, शब्द, तोंडातील चूका, नजरचूका , ऐकण्यातील चूका यातुन पाठ पाठांतराची गर्दी नकलेत मिसळते. दुसरी पध्दती म्हणजे यथाप्रती लेखनाचा आदर्श ठेवून केलेली नक्कल अशा पध्दतीत पदभ्रंश , अक्षरभ्रंश, वाक्यभ्रंश असे दोष निर्माण होतात. एका बैठकीत पोथी नक्कल करणे शक्य नसल्याने पोथीच्या पानांची उलटसुलट रचना होण्याची शक्यता असते या दृष्टीने या पध्दतीत पांठातरे निर्माण होतात. तिसरी पध्दती म्हणजे एकाने मुळ पोथी वाचावयाची व दुसऱ्याने ती लिहून काढावयाची यामुळे उच्चारभ्रशांसारखे दोष निर्माण होतात. चौथी पध्दती म्हणजे सांप्रदायिक नकलकाराने केलेली नकल. त्यात प्रक्षेपांचा भराणा अधिक होण्याची शक्यता असते. नकलकार अडाणी घोक्या असेल तर त्याच्या लेखनात भाषिक दोष निर्माण होतील. नकलकार जर चतुर, बुध्दिमान सांप्रदायिक असेल तर मुळ संहितेत तो अनेक प्रकारची पूर्तता करण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे संहिता भ्रष्ट होते नकलकाराकडून घडणाऱ्या चुकामुळे मुळ संहिता बदलत जाते. असे का होते ते पुढीलप्रमाणे

**१. अबुध्दिपुरस्सर बदल :—**

मुळ हस्तलिखिताची नक्कल करताना गैरसमजाने काही न समजल्यामुळे आणि निष्काळजीपणामुळे मुळ संहिता पाठात बदल होतात. पुढे हेच बदल पुढील नकलकारांच्या लेखनात होतात आणि यातुनच अधिक अपपाठ निर्माण होतात आणि मुळ संहिता भ्रष्ट होते. डॉ हल आणि जे. पी पोष्टगेट यांनी चुका होण्याची अबुध्दिपुरस्सर आणि बुध्दिपुरस्सर अशी कारणे Companion to classical Texts' आणि 'Textual criticism' या ग्रंथात दिलेली आहे. दृष्टीप्रमादामुळेही बरेच बदल घडून येतात. उदा. शब्दभ्रंश

, वाक्यभ्रंश, पदभ्रंश, शब्दभ्रशांत शब्द गाळणे , शब्द वाढणे , चुकीचा वाचणे, चुकीचा लिहीणे , एकाऐवजी दुसरा लिहीणे अशा चुका होतात.

❖ **अक्षरभ्रंश** —

कित्येक वेळा अक्षरसाम्यामुळे अक्षरभ्रंश होतात पूर्वी पोथ्यामंधून 'अ' हे अक्षर 'प्र' सारखे लिहीले जाई त्यामुळे 'अशा' ऐवजी 'प्राशा' ही चुक नकल काराकडून घडू शकते.

अक्षराभ्रंशात काही वेळा अनावधाने अक्षर सुटते

उदा. श्ररण — श्रण, सागर—सगर

काही वेळा वाचनदोषामुळे अक्षरभ्रंश संभवतो उदा. त—न, ध—घ, उ—ड, प—ष, प—ब, ट—ठ, क—फ, म—भ, या मुळे अपपाठ निर्माण होतात.

काही वेळा अक्षरातील उच्चारसाम्यामुळे अक्षरभ्रंश निर्माण होतात. उदा. ण—न, श—ष, न—ण

नकलकार अडाणी असेल तर त्याच्या मर्जीतनुजार तो ऱ्हस्व दिर्घ लिहीतो तर काही वेळा नकळत अक्षरांचे सुलभीकरण करून टाकतो मात्राबिंदभ्रंश त्यामुळेच उद्‌भवतो

उदा. चरणांगुळे — चरणागुळी

विशेष नाम व पारिभाषीक शब्द यांच्या वाचनातील संदिग्धतेमुळे पाठातंरे होतात.उदा. भिमसेन — भिमशेन , याज्ञसेनी — याज्ञशेनी

अडाणीपणामुळे एखाद्या वेळी संपुर्ण पद गाळले जाते त्यावेळी पदभ्रंश दोष निर्माण होतो.हे नकलकाराने केलेले बदल अबुध्दिपुरस्सर असतात. पण काही वेळा नकलकार हुशार, अभ्यासू असेल तर काही दोष निर्माण होतात त्यांना बुध्दिपुरस्सर बदल असे म्हटले जाते.

❖ **बुध्दिपुरस्सर बदल :—**

अडाणीपणामुळे पाठात झालेले बदल शोधून काढता येतात परंतु एखाद्या हुशार लेखनिकाने दुसऱ्या रचनेसमान आपली रचना जर पाठात घुसविली तर काम अवघड होऊन बसते.

लेखनिक जर हुशार असेल तर तो आपली पदे रचना मुळ संहितेमध्ये घुसडून देतो. ज्ञानेश्वरीची ओवीसंख्या नऊ हजार असताना काही प्रतीतून ती दहा हजाराच्या घरात गेली आहे. नामदेवगाथा, तुकारामगाथा, अशाच फुगलेल्या आहेत. याचे कारण धार्मिक ग्रंथाच्या लोकप्रियतेमळे पठनकर्ते किर्तनकार आपली रचना त्यात घुसडून देतात. काही वेळा मुळ हस्तलिखितातील कठीण शब्दाचा अर्थ समासात किंवा काकपाद टाकून लिहीला जातो. कालांतराने तो मजकुर मुळ म्हणुन स्विकारला जातो. व संहितेत भर पडत जाते. काही वेळा मुळ हस्तलिखीतातील प्रसंग अधिक नाट्यपुर्ण , चटकदार आणि किर्तनासाठी रसाळ होण्यासाठी अधिक भर घातली जाते. यामुळे मुळ संहिता बदलांना प्रक्षेप किंवा प्रक्षिप्तपाठ असे म्हणतात.

स्वमत प्रसारासाठी आपल्या आश्रयदात्याला आणि सांप्रदायिकाला आनंदी ठेवण्यासाठी विलक्षण पंथाभिमानातून तसेच श्रध्देतुनही ग्रंथात भर पडत जाते. काही वेळा नकल कार मुळ संहितेत दुरूस्ती करण्याचा प्रयत्न करतो व त्यामुळे प्रक्षेप वाढीस लागतात. काही वेळा प्रतकार जी प्रत करीत असेल

त्यावेळी इतर ग्रंथातील समानार्थक उतारे त्याला आठवू लागतात व ते तो मुळ संहितेत बसवून देतो. दुर्बोधता टाळण्यासाठी प्रतकार अर्थाला अनुसरून नवी रचना करतो त्यातून प्रक्षेप वाढीस लागतात.

प्रक्षेपांमुळे जशी मुळ संहितेत वाढ होते त्याचप्रमाणे विक्षेपांमुळे किंवा अवक्षेपांमुळे मुळ संहिता भ्रष्ट होते. मुळ संहितेतील लेखकाला आटोपशीरपणा यावा म्हणून किंवा दुर्बोधता टाळण्यासाठी किंवा शृंगाराबद्दल अश्लील वर्णने धर्मग्रंथात येऊ नयेत या समजुती पोटी लेखनिक काही भाग गाळून टाकतो, नष्ट करतो त्याला अवक्षेप असे म्हटले जाते

उदा. नवरस नारायणाचे शल्यपर्व किंवा मुक्तेश्वराचे सभापर्व यांच्या प्रतित बऱ्याच प्रमाणात आवक्षेप आढळतो.

काही वेळा नजरचुकीने मुळ संहितेतील मजकुर गाळला जातो काही वेळा स्वमताला किंवा स्वपंथाला विराध दर्शविणारे संहितेतील काही भाग नकलकार गाळून टाकतो त्यामुळे अवक्षेप निर्माण होतात.

काही वेळा धार्मिक ग्रंथांतील प्रतलेखनात तत्त्वज्ञानाला महत्त्व देऊन प्रतकार पोथीच्या पहिल्या तीन ओळी लक्षपूर्वक न्याहाळतो पण चौथी ओळ यमकप्रासयुक्त समजून दुर्लक्ष करतो व स्वत:ची यमकरचना त्याठिकाणी बसवून देतो त्यामुळे पाठचिकित्सेचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होतो पाठचिकित्सकाला मुळ संहितेतील आपपाठ कोणते आणि पाठांतरे कोणती याची अचूक जाणीव झाल्याशिवाय त्याला पाठनिश्चीती करता येणार नाही.

अशा पध्दतीने 'संहिता' निश्चित करण्यासाठी पाठचिकित्साशास्त्राची गरज असते. ही पाठचिकित्सा ज्ञेयनिष्ठ व ज्ञातृनिष्ठ या दोन पध्दतीने केली जाते. संहितेमध्ये विविध पध्दतीने बदल होतात हे का व कसे होतात हे जाणून घेण्याचा प्रयत्नही प्रस्तूत लिखानात केला आहे.

**संदर्भ**

१ साहित्यशोधणी :— उषा देशमुख